# मुलांना हवे मानसिक स्वातंत्र्य !

## महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफ बालकांच्या शारीरिक आरोग्याबरोबर जपतंय मानसिक आरोग्यही !

**दै. आवाज वृत्तसेवा...**

महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यातील अंगणवाड्यामंध्ये पालक मेळावा आयोजित करण्यात येतो. याचा सकारात्मक परिणाम होताना दिसतो. आरंभ या कार्यक्रमाच्या तीन मुख्य व्यासपीठांपैकी एक म्हणजे पालक मेळावा. घरभेटी आणि मातामंडळ बैठकांबरोबरच पालक मेळाव्याचा उद्देश म्हणजे संपूर्ण समुदायाने एकत्र शिकणे आणि मुलांच्या संगोपनाबद्दल आई बरोबर वडील आणि कुटुंबातील सदस्यांनी जागरूक होणे आवश्यक आहे.

महिला व बालविकास विभागामार्फत महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवल्या जातात. याप्रमाणे युनिसेफ ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक संस्था आहे जी मुले आणि मातांची कल्याणासाठी काम करते. तिचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, जगभरातील मुलांना अन्न, आरोग्य सेवा, शिक्षण आणि संरक्षण उपलब्ध करून देणे, आपत्ती, युद्ध किंवा दारिद्र्यग्रस्त भागातील मुलांना मदत करणे, लसीकरण, स्वच्छ पाणी आणि शिक्षणाच्या कार्यक्रमांद्वारे मुलांचे जीवन सुधारणे यासाठी १९४६ साली दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धग्रस्त देशांतील मुलांना मदत करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली.

लहान मुलांना खेळ, संवाद आणि सुरक्षित वातावरणापासून ते त्यांच्या आहारापर्यंत माहिती सांगणारे स्टॉल्स, खेळणी, शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबद्दल माहिती देण्याचे काम अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य, आशा ताई करत आहेत. प्रत्येक बालकाच्या उत्तम वाढीसाठी पहिले हजार दिवस सुवर्णमयी असतात. त्यात पालक, घरातील सदस्याचा सहभाग अत्यावश्यक असतो. त्यामुळे पालकांशी मनमोकळा संवाद साधण्यासाठी महिला व बालविकास विभाग युनिसेफच्या समन्वयाने आईबरोबर वडिलांनीही बालकाला सांभाळण्याची जबाबदारी घ्यावी याचबरोबर घरातील सदस्यांचीही तेवढीच जबाबदारी असल्याचे प्रबोधन या पालक मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येते.

अनेकदा मी मुलांना काहीही करण्यापासून रोखते, त्यांना ओरडते. त्यामुळे मुले तात्पुरती गप्प बसतात. पण पालक मेळाव्याच्या माध्यमातून हे समजले की मुलांना कायम नकारात्मक प्रतिक्रिया देऊन त्यांच्या वाढीवर परिणाम होतो. त्यांना त्यांच्या पद्धतीने गोष्टी करू दिल्या तर त्यांची बौद्धिक वाढ उत्तम होते. अशी प्रतिक्रिया अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकाने दिली.

अंगणवाड्यांचे समूह एकत्रित करून त्यांच्या पालकांना मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र करण्यात येते. या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांच्या विकासात सुधारणा, कुटुंब आणि समुदाय सशक्त करणे, बाल संगोपनाबद्दल समुदाय जागरूकता वाढवणे, अंगणवाडी आणि आशा ताईंची भूमिका अधिक बळकट करणे, समग्र बालकांच्या काळजीबाबत दृष्टीकोन तयार करणे, समुदायाचा सहभाग आणि आत्मविश्वास वाढविणे, सातत्याने टिकणाऱ्या बालकांच्या पद्धतींचा प्रसार करण्याचे काम करण्यात येते.

या मेळाव्यात दोन वर्षे वयोगटापर्यंत मुलांसाठी वयोगटानुसार खेळणी आणि शैक्षणिक साहित्य दाखवले जाते, दोऱ्यांचे जुने पुंजके, साबणाचे बॉक्स, कागदी डबे या वापरलेल्या वस्तूंपासून तयार केलेल्या खेळांच्या माध्यमातून मुलांच्या पाचही इंद्रियांचा विकास करणे हा उद्देश होय. दोऱ्यांचे वापरलेले रिळ, टाकून दिलेली झाकणे, पुठ्ठा, बांगड्या, साबणाचे रिकामे कागदी डब्बे यापासून बनवलेली तोरणं, माळा, रंगीत खेळणी मुलांना मेळाव्यात खिळवून ठेवतात. खेळणाऱ्या मुलांबरोबर त्यांची आई आणि इतर पालकांचाही समावेश होतो. काही खेळ हे पालकांसाठी असतात.

या मेळाव्याच्या माध्यमातून बालकांशी संवाद साधण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. मुलांना विविध मुखवटे व टोपी घालून त्यांना आरशासमोर उभे केले जाते. जेणेकरून त्यांना स्वत:चा चेहरा पाहता येतो. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून संवाद वाढवणे, मेंदूचा विकास, सामाजिक आणि भावनिक वाढ होण्यास मदत होते. याचबरोबर ब्रेन वायरिंग खेळाच्या माध्यमातून खेळ अनुभव आणि संवेदनाच्या आधारे मेंदूच्या न्यूरल कनेक्शनच्या निर्मितीचे महत्त्व समजावतो. मुलाचा मेंदू पहिल्या १००० दिवसात सर्वाधिक वाढते म्हणून या काळात स्पर्श, संवाद आणि खेळ यावर भर दिला जातो. पालक मेळाव्यात मुलांसाठी बाहूली घर तयार केले जाते. यामध्ये कल्पनाशक्तीचा वापर करून खेळ खेळवले जातात. यामुळे त्यांच्या सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते. पौष्टिक पोषण अंतर्गत सहा महिन्यांपर्यंत आणि त्यानंतरचे अन्न कसे असावे हे दाखवले जाते. तसेच जंक फुडचे दुष्परिणाम आणि स्थानिक फळभाज्यांचा उपयोग सांगितला जातो.

याचबरोबर आरोग्याची जनजागृती कार्यक्रमात लसीकरणाचे वेळापत्रक, स्वच्छता, आयर्न-फॉलिक सिडचे महत्व, निमिया प्रतिबंध इत्यादी माहिती वैद्यकीय अधिकारी, आशा वर्कर यांच्यामार्फत करण्यात येते.

पालक हेच मुलांचे पहिले शिक्षक असतात, तीन वर्षांच्या वयातील विकास हा आयुष्यभरासाठीचा पाया घालतो. मुलांशी संवाद, प्रेम आणि संधी दिल्यास त्यांचा मेंदू, लक्ष आणि स्मरणशक्ती जलद वाढते. प्रोत्साहन हेच सर्वांत मोठे शिक्षण आहे.

**श्रद्धा मेश्राम,**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय, मंत्रालय**

# बस्स आता पुरे!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तब्बल नऊ वर्षांनंतर राज्यभरातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूका होत असून 'च्या' दरम्यान सत्ताधाऱ्यांकडून केली जात असलेला अतिरेक सर्वत्र सर्व वृत्तवाहिन्या तसेच सामाजिक माध्यमांमधून जनता पाहत आहे.
ते पाहून लिहावेसे वाटते की अशा नगरपंचायत, नगरपरिषद असलेल्या दहशतीच्या गावाला आता नव्या पहाटेची गरज आहे.. ती प्रत्येक नगरपरिषद असो वा नगरपंचायत ते म्हणजे एक गाव आहे जे बाहेरून शांत दिसणारं, पण आतून थरथर कापणारं...
सत्ता हातात ठेवण्यासाठी काही सत्ताधारी जणू राक्षसी रूप धारण करून गावावर दहशतीचं साम्राज्य निर्माण करत आहेत. नगरपालिका निवडणूक लागली आणि जणू लोकशाहीचं अपहरण झालं! अनेक नगरसेवक बिनविरोध...
पण यामध्ये लोकांचा विश्वास नव्हता प्रतिक्रिया नव्हती होता केवळ दबाव, दडपशाही,पैसे आणि धमक्या....
पण..अरे पण 'नगराध्यक्ष' तर इथे थेट जनतेतून आहे ना..मग आता काय?
कोणी कितीही दहशत केली तरी शेवटी निवडणूक आता जनता हातात घेणार हे नक्की..! म्हणूनच खऱ्या रणसंग्रामाची सुरुवात इथे झाली.एखाद्या उमेदवाराला रोखण्यासाठी घरपोच धमक्या,निवडणूक अर्ज भरू नका म्हणून तगादा.. फोन करून दबाव आणणे हे जरी दृष्टीआड झाले असेल तरी ते जनता जाणून आहे यात तिळमात्र शंका नाही..या सगळ्याने गावातील प्रत्येक नागरिक चिंतेत जरी असला तरी तो आता स्वस्थ बसणार नाही.. तो त्याला मिळालेल्या अधिकाराचा योग्य वापर करण्यासाठी सज्ज झाला आहे कारण
या अंधारात एक सत्य विसरलं गेलं ते म्हणजे धमक्या मतपेटीला घाबरवू शकत नाहीत! गावातील प्रत्येकाला सारे प्रकार माहीत आहेत. भीती, दहशत, सत्तेचा गैरवापर हे सर्व लोक समोरच्या डोळ्यांनी पाहत आहेत.
दहशतीने काही नगरसेवक बिनविरोध




झाले असतील पण जनता बिनविरोध नसते! आणि त्यातच जनतेला प्रत्येक ठिकाणी अर्थात काही गावात 'नगराध्यक्ष' देखील बिनविरोध झाले आहे ते सोडल्यास बऱ्याच ठिकाणी किमान सत्ताधाऱ्यांनी दिलेल्या उमेद्वारासमोर एक मसिहा उभा राहिला आहे ते परिस्थिती बदलण्याचं स्वप्न घेऊन....
गावातील प्रत्येक घर, प्रत्येक रस्त्याला पुन्हा स्वाभिमान परत मिळवून देऊ शकणारा...
छातीत निर्धार, मनात प्रामाणिकता आणि लोकांसाठी काम करण्याची तळमळ असणारा...जी जनता आज घाबरून शांत बसली आहे त्याच जनतेच्या मताने उद्या दहशतीचा अंत होणार आहे.

लोकशाहीचा खरा अर्थ एकच मी कोणालाही घाबरून नव्हे,तर माझ्या मनाने मत देतो....
आज त्या प्रत्येक गावातील लोक एकवटले आहेत ते घेऊन मनात फक्त तीन शब्द... बस्स आता पुरे!
कोण कितीही धमक्या देऊ देरस्त्यावर भीती निर्माण होऊ देपण मतपेटीसमोर जनता एकच निर्णय घेणार सत्य आणि स्वाभिमानाच्या बाजूने!
दहशत पसरवून मिळवलेली सत्ता टिकत नाही,पण लोकांच्या विश्वासाने मिळवलेला विजय गाव बदलतो.
यंदाची निवडणूक ही फक्त सत्ता बदलाची नाही तर ही गावाच्या भवितव्याची लढाई आहे.
दहशत विरुद्ध धैर्याची आहे.
अन्याय विरुद्ध न्यायाची आहे.
भीती विरुद्ध जनतेच्या शक्तीची आहे!
जे गावाला वाचवण्यासाठी उभे राहिले भले ते शहर विकास आघाडी करून एकत्र आलेले असो वा विरोधक म्हणून पक्षांतर केलेले असो किंवा अपक्ष असो..जे अन्यायाविरुद्ध एकत्र येऊन लढत आहे
तेच आपले, तेच खरे, तेच पुढारी.
मग चला ..आपली सद्सद्विवेकबुद्धी जागी ठेवून मताचा अधिकार वापरा तोही निर्भयपणे....
गावाचा स्वाभिमान परत मिळवण्यासाठी वापरा....!
राज्यभरातून दिसत असलेल्या गावागावातील वातावरणाचा विचार करता दहशत संपवायला जर गाव एकवटले तर कोणाचीही ताकद लोकशाहीला रोखू शकत नाही यात तिळमात्र शंका नाही...

***

## डीएसपी म्युच्युअल फंडतर्फे गुंतवणूकदारांसाठी चार योजनांचा शुभारंभ; डीएसपी निफ्टी मिडकॅप १५० इंडेक्स, ईटीएफ, डीएसपी निफ्टी स्मॉलकॅप २५० इंडेक्स फंडासह ईटीएफ योजना सादर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक: डीएसपी म्युच्युअल फंडने गुंतवणूकदारांसाठी आज चार नवीन पॅसिव्ह फंड योजना आणल्या आहेत. डीएसपी निफ्टी मिडकॅप १५० इंडेक्स फंड, डीएसपी निफ्टी मिडकॅप १५० ईटीएफ फंड, डीएसपी निफ्टी स्मॉलकॅप २५० इंडेक्स फंड आणि डीएसपी निफ्टी स्मॉलकॅप २५० ईटीएफ फंड अशा या चार योजना आहेत.

या नव्या योजनांच्या शुभारंभामुळे पॅसिव्ह अर्थात अप्रत्यक्ष गुंतवणूक प्रकारात डीएसपीच्या गुंतवणूक योजनांचे विश्व आणखी विस्तारले आहे. मिड- आणि स्मॉल-कॅप गटातील कंपन्यांच्या रुपाने भारतातील उद्योगविश्वाचे व्यापक स्वरुपात चित्र उलगडते, तसेच गतिमान कॉर्पोरेट विश्वाचे ते एकत्रित प्रतिनिधित्वही करतात. त्यामुळे या फंडांच्या रुपाने मिड- आणि स्मॉल-कॅप गटातील कंपन्यांमध्ये नियमांवर आधारित निर्देशांकाच्या माध्यमातून अल्प खर्चात गुंतवणूकीची संधी गुंतवणूकदारांना प्राप्त झालेली आहे. नवीन फंड ऑफर (एनएफओ) २४ नोव्हेंबर ते ०८ डिसेंबर २०२५ या कालावधीदरम्यान खुली राहणार आहे.

## वीरशैव नागरी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी वैभव वाळेकर यांची बिनविरोध निवड



**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक रोड येथील श्री दत्त मंदिर चौक येथे असलेल्या वीरशैव नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी मा श्री .वैभव बद्रीनाथ वाळेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष कै.श्री. बद्रीनाथ तथा (नानासाहेब) वाळेकर यांच्या आकस्मिक निधना नंतर संस्थेचे अध्यक्ष पद रिक्त झाले होते. या अध्यक्ष पदाच्या निवडीसाठी आज शुक्रवार दि.२८/११/२०२५ रोजी मा.श्री. कैलाश आढाव, सहाय्यक सहकार अधिकारी, उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था, नाशिक यांच्या अध्यक्षते खाली सर्व संचालक मंडळाची बैठक बोलावण्यात आली होती. या प्रसंगी कै.बद्रीनाथ तथा (नानासाहेब) वाळेकर यांच्या आकस्मिक निधन झाले असुन अध्यक्षपदी मा.श्री.वैभव वाळेकर यांची निवड करावी. असा प्रस्ताव मा.श्री. नंदकिशोर नगरकर यांनी मांडला. यावेळी उपस्थित सर्व संचालक मंडळाने सर्वानूमते अनुमोदन दिले असता, उपनिबंधक मा.श्री.कैलाश आढाव यांनी तसेच सर्व संचालक मंडळ यांनी मा.श्री.वैभव बद्रीनाथ वाळेकर यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. प्रसंगी उपस्थित मा.श्री..नंदकिशोर नगरकर, मा.श्री.भिकन अप्पा निळकंठ, मा.श्री.रविशेठ दंदणे, माश्री.अनिलशेठ गुळवे, मा.श्री. शेखर भायभंग, मा.श्री. दत्तात्रय सोनवणे, मा.श्री.शेखर नगरकर, मा, सौ..विजयाताई होनराव, मा.सौ.पूनम वाळेकर, मा.सौ. राजश्री ताई साखरे,मा. श्री. किरण औशिकर,मा.श्री.सूरज पगारे व मा.श्री.अतूल धोंगडे संचालकांनी तसेच संस्थेच्या व्यवस्थापक मा.श्री. स्वप्नील विभांडिक आणि कर्मचारी व मा.श्री. तुषार लिंगायत व मा,श्री.प्रसाद वाळेकर यांनी नवनियुक्त अध्यक्ष मा.श्री.वैभव बद्रीनाथ वाळेकर यांचे अभिनंदन केले. तसेच पुढील काळात सर्वांनी त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली. या प्रसंगी मा.श्री.शेखर भायभंग व मा.श्री. निळकंठअप्पा यांनीही त्यांचे मनोगत व्यक्त करताना श्री वैभव वाळेकर यांना पुढील कामकाजात सर्वोतोपरी मदत करण्यात येईल असे म्हणाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांचा 'महात्मा फुले समता' पुरस्काराने गौरव




**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई,पुणे,नाशिक,दि.२८ नोव्हेंबर:- मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे विचार रुजविण्याचे महत्वपूर्ण काम करत आहे. त्यांचे विचार आजही समाजासाठी तितकेच प्रेरणादायी आहे. देशातील ओबीसींचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्व काम करतो आहे असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह यांनी केले.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले पुण्यतिथीच्या दिवशी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिला जाणारा 'समता पुरस्कार' यावर्षी ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना आज समता भूमी फुले वाडा, पुणे येथे माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामध्ये रुपये एक लक्ष, फुले पगडी, मानपत्र शाल आणि स्मृतीचिन्ह यांचा समावेश आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सन्मान पत्राचे वाचन डॉ.शेफाली भुजबळ यांनी केले.

यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर,प्रा.लक्ष्मण हाके, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष बापू भुजबळ, सत्संग मुंडे, डॉ.स्नेहा सोनकाटे, डॉ. शेफाली भुजबळ, विशाखा भुजबळ,डॉ. सुदर्शन घेरडे, यश बोरावके, मंजिरी धाडगे, प्रीतेश गवळी, पंढरीनाथ बनकर, महिला वैष्णवी सातव यांच्यासह अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी व राज्यभरातील समता सैनिक उपस्थितीत होते.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह म्हणाले की, ते म्हणाले की सन २००६ पासून मंत्री छगन भुजबळ व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेशी जोडलो गेलो. बिहार राज्यात ओबीसींच्या प्रश्नांवर मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली विविध मेळावे घेऊन ओबीसी बांधवांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला जात आहे. देशातील ओबीसी समाजासाठी मंत्री छगन भुजबळ यांचा लढा सुरु असून त्यांचे योगदान हे अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसींचे हे काम सुरूच राहील असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

पुरस्काराला उत्तर देतांना ज्येष्ठ विचारवंत डॉ.सुखदेव थोरात म्हणाले की, क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी जातिव्यवस्था अस्पृश्यतेचे विश्लेषण करून थांबले नाहीत; तर त्यांनी शूद्र, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या न्याय आणि उन्नतीसाठी प्रत्यक्ष कार्य केले. जातिभेद निर्मूलन , खालच्या जातीतल्या व्यक्ती आणि स्त्रियांना शिक्षण, सामाजिक राजकीय हक्क, एकेश्वरवाद, तर्कनिष्ठता या सर्व गोष्टींसाठी त्यांनी लढा दिला. महात्मा फुले यांनी शुद्र, दलित, स्त्रिया शेतकरी यांच्या प्रश्नांच्या स्वरूपाचे अध्ययन केले. त्याची जातिव्यवस्थेमध्ये असलेली कारणे शोधली.व त्यावर उपाय सुचविले व त्यांच्यामध्ये परिवर्तन आणण्याकरिता सामाजिक चळवळ उभी केली. त्याकरिता संस्था उभा केल्या व आपल्या हयातीत बदल घडवून आणले. त्यांच्या या कार्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी खंबीरपणे त्यांना साथ दिली असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, महात्मा फुले यांनी आपल्या संशोधनातून शुद्र, अतिशुद्र, दलित, स्त्रिया, शेतकरी व कामगार यांच्या प्रश्नांची उकल केली. महात्मा फुले यांनी शोधून काढले की शूद्र आणि अतिशुद्रांचे शोषण जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेमुळे होते, कारण शूद्र आणि अतिशुद्रांना सर्व आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक अधिकारांपासून वंचित ठेवले गेले होते.त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून समानता, विज्ञानवाद आणि न्याय यांचा पुरस्कार केला. महात्मा फुलेंच्या सामाजिक चळवळीने अनेक समाजसुधारक निर्माण केलेत. त्याला सामाजिक व राजकीय चळवळींना प्रोत्साहन दिले. ही परंपरा शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे नेली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच महात्मा फुले समता परिषदेच्या कार्याचा गौरव करत सन २०१० च्या सुमारास नागपूर येथील विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते ऊश्रळ्गी ळप खपवळर: खप डशरीलह े ष र ऊेप ऊश्रीींळपू या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले असल्याच्या आठवण त्यांनी यावेळी सांगितली. यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या की, क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना अज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढले. त्यामुळे आज महिला समाजाच्या मुख्य प्रवाहात विविध क्षेत्रात काम करतांना दिसत आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद वाटचाल करत आहे. ओबीसींच्या न्याय हक्कासाठी मंत्री छगन भुजबळ हे लढा देत आहे. त्यांच्या माध्यमातून फुले वाडा व परिसराचा विकास करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले की, ओबीसींच्या न्याय हक्कासाठी लढणारे मंत्री छगन भुजबळ हे खरे शिलेदार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आपण वाटचाल करत आहोत. देशभरात ओबीसींना त्यांच्या हक्काचा वाटा मिळावा यासाठी लढा दिला जात आहे. आज ओबीसी विद्यार्थ्यांचे शिक्षणातून गळतीचे प्रमाण अधिक आहे. या विद्यार्थ्यांना जेव्हा लोकसंख्येच्या तुलनेत निधी उपलब्ध होईल त्यावेळी खऱ्या अर्थाने त्यांना संधी मिळेल आणि त्यातून सामाजिक समता प्रस्तापित होईल असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक करतांना आमदार पंकज भुजबळ म्हणाले की, डॉ. थोरात यांच्या संशोधनाचा पाया हा सामाजिक न्याय व आर्थिक समता आहे. दलित-मागासवर्गीय समाजावरील आर्थिक भेदभाव, ग्रामीण विकास, कृषी अर्थशास्त्र, शिक्षणातील विषमता, गरिबी व सामाजिक बहिष्करण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक पातळीपर्यंत मर्यादित नसून धोरणनिर्मात्यांना दिशा देणारे ठरले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची वाटचाल त्यांनी यावेळी मांडली.

डॉ.सुखदेव थोरात यांचा परिचय - भारतीय सामाजिक-आर्थिक विचारविश्वात मोलाची छाप सोडणारे अर्थशास्त्रज्ञ, शिक्षक, अभ्यासक आणि धोरणनिर्माते म्हणून डॉ. सुखदेव थोरात यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. सामाजिक न्याय, आर्थिक समानता आणि शिक्षण सर्वांसाठी खुले करण्याच्या दिशेने त्यांनी केलेल्या कार्याची देशव्यापी दखल घेतली गेली आहे. डॉ.थोरात यांनी सन २००६ ते २०११ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. उच्च शिक्षणाच्या लोकशाहीकरणावर भर देत त्यांनी प्रवेश, शिष्यवृत्ती, मागास समाजातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती यासाठी अनेक धोरणे राबवली. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चचे अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डॅलिट स्टडीजचे संस्थापक संचालक पद भूषवित सामाजिक भेदभाव, जातीय विषमता आणि गरीबीवरील संशोधनाला त्यांनी नवा आयाम दिला. डॉ. थोरात यांच्या संशोधनाचा पाया हा सामाजिक न्याय व आर्थिक समता आहे. दलित-मागासवर्गीय समाजावरील आर्थिक भेदभाव, ग्रामीण विकास, कृषी अर्थशास्त्र, शिक्षणातील विषमता, गरिबी व सामाजिक बहिष्करण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक पातळीपर्यंत मर्यादित नसून धोरणनिर्मात्यांना दिशा देणारे ठरले आहे. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाच्या मान्यतेत भारत सरकारने त्यांना पद्मश्री सन्मान प्रदान केला. देश-विदेशातील अनेक विद्यापीठांकडून त्यांना सन्माननीय पदव्या, पुरस्कार आणि विशेष गौरवांनी सन्मानित करण्यात आले आहे. अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून पुढे येत आंतरराष्ट्रीय दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ, संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञ बनलेले डॉ. सुखदेव थोरात हे आजच्या भारतासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवतावादी मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था घडविण्याची त्यांची धडपड अजूनही सुरूच आहे.

****

## लासलगाव महाविद्यालयात महात्मा फुले पुण्यतिथी साजरी




**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव - येथील नूतन विद्या प्रसारक मंडळ संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. पर्यवेक्षक प्रा.उज्वल शेलार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.देवेंद्र भांडे, प्रा.सुनिल गायकर व उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. याप्रसंगी प्रा.रामनाथ कदम यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत स्त्री शिक्षणाबद्दलचे कार्य विषद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री.गोविंदराव होळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.देवेंद्र भांडे, प्रा.सुनिल गायकर आणि रा.से.यो. स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. यावेळी उच्च माध्यमिक विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोलापूर बसस्थानकावरील अस्वच्छ शौचालयाबद्दल आगार व्यवस्थापक निलंबित!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सोलापूर: २८ नोव्हेंबर - आज दि. २८ नोव्हेंबर रोजी (शुक्रवार) परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सोलापूर मध्यवर्ती बसस्थानकाला पुन्हा एकदा भेट दिली. या भेटी दरम्यान शौचालय, पाणपोई सारख्या सर्वसामान्य प्रवासी व नागरिकांनी पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधा कडे अक्षम्य दुर्लक्ष केल्या प्रकरणी सोलापूर आगाराचे ' आगार व्यवस्थापक ' यांना निलंबित करण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. तथापि, राज्यातील एसटीच्या २५१ आगार प्रमुखांनी या घटनेकडे अत्यंत गंभीरपणे पहावे आणि प्रवाशांच्या सोयी सुविधांच्या बाबतीमध्ये विशेषत: बसस्थानकावरील महिला प्रसाधनगृहाच्या बाबतीमध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जी यापुढे खपवून घेतली जाणार नाही.असे स्पष्ट निर्देश यावेळी मंत्री सरनाईक यांनी दिली आहेत.

## क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने विनम्र अभिवादन




**दै. आवाज वृत्तसेवा...**

येवला,दि.२८ नोव्हेंबर:- क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १३५ व्या पुण्य तिथीच्या निमित्ताने अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने येवला संपर्क कार्यालय व महात्मा फुले नाट्यगृहात येथे पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, माजी सभापती संजय बनकर, सचिन सोनवणे, भाऊसाहेब धनवटे, सुमित थोरात, गणेश गवळी, पार्थ कासार यांच्यास अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.